# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

(भारतीय नागरिक सुरक्षा संहिता-2023 च्या कलम 173 अन्वये (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई शहर, पोलीस ठाणे लो. प्र.वि., पहिली खबर क्र. 06/2025, दिनांक 05/02/2025
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, कलमे Sections 7, 7(a), 12
(ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार ........, तारीख पासून 04/02/2025, वेळ 15.15 वा. सुमारास, तारीख पर्यंत 05/02/2025 वेळ 13.30
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख 04/02/2025, वेळ 11.00 वा.
Information received at P.S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 53/2025, तारीख 05/02/2025, वेळ 23:30
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : ........, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव ① कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, बोरीवली विभाग, म्हाडा, मुंबई, ठिकाणाचे नंबर ........, गल्ली ........, रस्त्याचे नाव ........
Address of Occurrence Name तिसरा मजला, No. if any रूम नं. 475 Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ② श्री. गणेश जनरल स्टोअर्स, नेहरू रोड, हायवे जंक्शन, सांताक्रुझ (पू) मुंबई.
Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name रवि बनसोडे (b) वडीलाचे / पतीचे नाव भिकाजी बनसोडे
Father's /Husband's Name
(c) जन्म तारीख व वय 42 वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 9594477897
Date of Birth & Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक — दिल्याचा दिनांक — दिल्याचे ठिकाण — (f) व्यवसाय धंदा
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदू, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता : ........ गल्ली / सर्वे नं. ........ घर / नाव नंबर ........ फोन /मो. नंबर ........ पॅन नं. ........ वोटर्स नं. ........
Address : Ward House/Name No. Phone/M. No. Par No. Card No.
न्यू. एस. आर. ए. बिल्डींग, नो. 04, तिसरा माळा, फ्लॅट क्र. 313, अय्यप्पा मंदीराजवळ, हनुमान नगर, कांदिवली (पूर्व), मुंबई
रस्त्याचे नाव ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........ गाव ........ पोस्ट ........ पो. स्टे. ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........ सध्याचा पत्ता ........
Taluka Distt. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपींचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
① श्री. दिनेश शेळके, कार्यकारी अभियंता, बोरीवली विभाग, म्हाडा, मुंबई मंडळ (म्हाडा)
② खाजगी इसम संजय त्रिवेदी, कॉन्ट्रॅक्टर, म्हाडा, वय:49 वर्षे,
③ खाजगी इसम राजकुमार यादव (लालाभाई), रिक्षा चालक, वय-36 वर्षे

Scanned with OKEN Scanner

जबाब दि. 05/02/2025

श्री. जीत शिवाजी वनसोडे, वय. 42 वर्षे, धंदा व्यवसाय, रा.ठि. रुम, एस.आर.ए. बिल्डींग, ओ/04, तिसरा मजला, फ्लॅट क्र. 313, आरमधा मंदिराजवळ, हनुमाननगर, कांदिवली (पूर्व), मुंबई यांच्या स्वतंत्र पानावर नोंदविण्यात आलेला जबाब हिच गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे

समक्ष

(सुनिता दिघे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

Scanned with OKEN Scanner

जबाब दि. ०५/०२/२०२५

श्री. रवि भिकाजी बनसोडे, ४२ वर्षे, धंदा – व्यवसाय, रा.ठी. न्यु एस.आर.ए. बिल्डींग, अे/०४, तिसरा माळा, फ्लॅट क्रमांक ३१२,३१३, अय्यपा मंदीराजवळ, हनुमान नगर, कांदीवली (पूर्व), मुंबई. मोबाईल क्रमांक ९५९४४७७८९७. आधार क्र. – २१३२२००२६७९७.

———•———

मी, वरिलप्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर माझे कुटुंबियांसह रहावयास आहे. माझे सोबत माझी आई सौ. कमल बनसोडे, वय ६० वर्षे, वडिल नामे श्री. भिकाजी बनसोडे, वय ६८ वर्षे, पत्नी सौ. अर्चना बनसोडे, वय ३५ वर्षे, मोठा मुलगा नामे आदित्य बनसोडे, वय १६ वर्षे, लहान मुलगी नामे आराध्या बनसोडे, वय १२ वर्षे असे रहावयास आहे. माझा फायबर मॅन्टेनसचा (वोडाफोन मोबाईल कंपनी) व्यवसाय असून त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर माझा व माझ्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालतो.

सन २००७–२००८ मध्ये म्हाडा ने मिलिंद चाळ, हनुमाननगर, आकुर्ली रोड, कांदीवली (पूर्व), मुंबई येथील सर्वे केला. मी, त्या ठिकाणी सन १९८७ ते २०१८ पर्यंत राहावयास होतो. मिलींद चाळीमध्ये माझे वडील भिकाजी बनसोडे व विक्रम बनसोडे यांचे एकत्र कुटुंब राहावयास होते. नमुद चाळीमध्ये आमच्या ०२ रूम व ०१ गाळा होता. सन २०१८ मध्ये माझे वडील व माझे काका यांना विकासकाकडून न्यू एस.आर.ए. बिल्डींग, ए/४ मध्ये फ्लॅट क्र. ३१२ व ३१३ या फ्लॅटचा ताबा मिळालेला आहे. आमच्या गाळयाच्या बदल्यात विकासकाने रूम न दिल्याने तो गाळा तसाच आहे. माझे वडील व काका असे एकत्र कुटुंब असताना सन २०१० मध्ये माझे काका यांनी त्यांचे झोपडे मला बक्षीस पत्र म्हणून दिलेले आहे. सन २०२४ मध्ये शासनाने अभय योजना सुरू केल्याने माझ्या काका यांचे नावे असलेली रूम माझे नाव हस्तांतरण करण्यासाठी या योजनेअंतर्गत लाभ मिळणेकरीता मी दिनांक ३१/१२/२०२४ रोजी भूव्यवस्थापक, बोरीवली विभाग/मुंबई मंडळ, बांद्रा, मुंबई यांना अर्ज केला होता. माझा नमुद अर्ज पुढील कार्यवाहीकरीता कार्यकारी अभियंता, बोरीवली विभाग/मुंबई मंडळ, म्हाडा, बांद्रा, मुंबई यांचे कार्यालयात पाठविण्यात आला. माझा अर्ज कार्यकारी अभियंता, बोरीवली विभाग/मुंबई मंडळ, म्हाडा, बांद्रा, मुंबई यांचे कार्यालयात पुढील कार्यवाहीकरीता प्रलंबित आहे.

श्री. साईकृपा को.ऑ.हौ.सो., चे अध्यक्ष कृष्णा तळेकर हे माझ्याच परिसरात राहावयास असल्याने मी त्यांना लहानपणापासून ओळखतो. त्यांनी मला सन २०१९ मध्ये कदमवाडी हनुमान नगर, अय्यपा मंदीराजवळ, कांदीवली (पूर्व), मुंबई हया चाळीतील १२ रहिवाशी यांनी कार्यकारी अभियंता, बोरीवली विभाग/मुंबई मंडळ, म्हाडा, बांद्रा, मुंबई येथे परिशिष्ठ ०२ मध्ये नावे समाविष्ठ करणेबाबत अर्ज केलेले असल्याचे सांगितले. परंतु, त्यातील ०४ रहिवाशी यांची पात्रता सिध्द झालेली आहे. ०८ रहिवाशी यांची पात्रता सिध्द झालेली नाही. तसेच, मिलींद चाळ, हनुमान नगर, आकुर्ली रोड, कांदीवली (पूर्व) येथील ओमकार पाटील यांचे परिशिष्ट २ मध्ये नाव समाविष्ट करण्यासाठीचे काम व कदमवाडी, हनुमान नगर येथील रामसुभाक मल्लाह यांचे आडनावामध्ये बदल करण्याबाबतचे काम प्रलंबित असल्याचे सांगितले. तसेच, त्याबाबतची कागदपत्रे त्यांनी मला दिली. १० रहिवाशी यांचे कागदपत्रांमध्ये त्रुटी असुन त्याची पूर्तता करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी, कार्यकारी अभियंता, बोरीवली विभाग/मुंबई मंडळ, म्हाडा, बांद्रा, मुंबई या कार्यालयात जाऊन पाठपुरावा करत होतो. परंतु, अद्याप नमुद झोपडपट्टी धारकांची कामे प्रलंबित आहेत.

माहे, जानेवारी २०२५ मध्ये मी माझ्या कामासंदर्भातील चौकशीकरिता कार्यकारी अभियंता, बोरीवली विभाग/मुंबई मंडळ, म्हाडा, बांद्रा, मुंबई येथे गेलो असता जयश्री मॅडम यांना भेटलो असता त्यांनी मला "त्यांचेकडे कामाचा लोड असल्याने थोडा वेळ दया. मी, तुमची फाईल व इतर १० रहिवाशी यांची फाईल निकाली काढते" असे सांगितले. त्यानंतर मी, दि. २७/०१/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वा सुमारास माझे कामासंदर्भात कार्यकारी अभियंता, बोरीवली विभाग/मुंबई मंडळ, म्हाडा, बांद्रा, मुंबई या कार्यालयात गेल्यावर



Scanned with OKEN Scanner

जयश्री मॅडम यांना भेटलो असता त्यांनी बोरीवली विभागाचे प्रमुख कार्यकारी अभियंता दिनेश श्रेष्ठ यांना भेटण्यास सांगितले. त्यानंतर मी बोरीवली विभागाचे प्रमुख कार्यकारी अभियंता दिनेश श्रेष्ठ यांना भेटलो. मी त्यांच्याशी माझे कामासंदर्भात चर्चा केली असता त्यांनी जयश्री मॅडम यांना बोलावुन घेतले.

जयश्री मॅडम हया फाईल घेवुन आल्या त्या कार्यकारी अभियंता दिनेश श्रेष्ठ यांनी बघितल्या. जयश्री मॅडम फाईल घेवुन गेल्यावर कार्यकारी अभियंता दिनेश श्रेष्ठ यांनी मला प्रत्येकी ६० हजार रूपये दयावे लागतील असे म्हणुन एका कागदावर ०६,६०,०००/– अशी रक्कम लिहुन मला दाखविली. त्यानंतर मी रक्कम जास्त होत आहे, कमी करा, अशी विनंती केली असता श्री. श्रेष्ठ यांनी कमीच सांगितले आहे असे सांगितले. श्री. श्रेष्ठ साहेबांनी मला खाजगी इसम संजय त्रिवेदी या व्यक्तीचा मोबाईल क्रमांक ८८२८३३०८६८ दिला व त्याचेकडे दोन लाख रूपये ॲडव्हान्स देण्यास सांगितले. मी खाजगी इसम संजय त्रिवेदी यांना आधीच पैसे दिले आणि काम नाही झाले तर, असे विचारले असता श्री. श्रेष्ठ साहेबांनी पुढच्या कामात ॲडजस्ट करतो, असे सांगितले. त्यानंतर मी इतर रहिवाशी यांचेशी बोलुन कळवितो, असे सांगितले. श्री. श्रेष्ठ साहेबांनी मला ०४–०५ दिवसांत फाईल पुढे पाठवितो असे सांगितले. त्यानंतर मी कार्यकारी अभियंता दिनेश श्रेष्ठ हे पैशाची मागणी करत असल्याचे अध्यक्ष, कृष्णा तळेकर यांना सांगितले. कृष्णा तळेकर यांनी मला नंतर बघुया, तुझ अगोदर काम करून घे, असे सांगितले.

माझे काम करणे हे शासकीय अधिकारी यांचे कर्तव्य असुन त्याकरिता ते माझ्याकडुन ६०,०००/– व इतर १० झोपडपट्टीधारक यांच्याकडून प्रत्येकी ६०,०००/– अशी एकूण रू. ६,६०,०००/– इतकी लाच मागत आहेत. कार्यकारी अभियंता दिनेश श्रेष्ठ यांचा व माझा इतर कोणताही आर्थिक व्यवहार नाही. मला शासकीय अधिकारी यांस लाच देण्याची इच्छा नसल्याने मी कार्यकारी अभियंता दिनेश श्रेष्ठ यांचे विरोधात तक्रार केली असुन त्यांचेवर कारवाई होणेकरीता मी दिनांक ०४/०२/२०२५ रोजी ला.प्र.वि., मुंबई कार्यालयात स्वहस्ताक्षरात लेखी अर्ज केला होता. त्यावेळी माझे सोबत माझा मित्र सिध्दार्थ काळे देखील होता.

मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील वरिष्ठांना भेटल्या नंतर वरिष्ठांनी स.पो.आ. शिरिष माणगावे व पोलीस निरीक्षक सुनिता दिघे यांना बोलावून घेतले. माझ्या तक्रार अर्जावर पुढील कार्यवाही तपासी अधिकारी म्हणून पो.नि. दिघे व पर्यवेक्षक अधिकारी स.पो.आ. माणगावे हे काम बघतील असे सांगून त्यांच्या सोबत जाण्यास सांगितले. स.पो.आ. माणगावे व पो.नि. दिघे यांनी मला व माझा मित्र सिध्दार्थ काळे यांना रूम नं २१८ येथे घेवून गेले. तेथे गेल्यांनतर माझा तक्रार अर्ज पो.नि. दिघे यांच्याकडे दिला, त्यांनी तो वाचून त्यांच्या ताब्यात ठेवला. पो.नि. दिघे यांनी माझ्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने पडताळणी कार्यवाही करण्यात येणार असल्याचे मला सांगुन तात्काळ दोन पंच व पोलीस पथकास पाचारण करून त्यांची ओळख करून दिली. त्यानंतर पंचांना माझ्या तक्रारीची थोडक्यात हकीकत सांगून मी केलेला तक्रार अर्ज दोन्ही पंचांस वाचण्यास दिला. माझे तक्रार अर्जावर पंचाच्या व समक्ष म्हणून पो.नि. दिघे यांनी सही केलेली आहे. पो.नि. दिघे यांनी पंचासमक्ष माझेकडे लोकसेवक श्री. श्रेष्ठ लाचेची मागणी करीत आहेत किंवा कसे? याबाबत पडताळणी करण्यात येणार असून सदर संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात येईल असे सांगितले.

त्यानंतर पो.नि. दिघे यांनी मला पडताळणी कारवाई करण्यापूर्वी करावयाच्या पडताळणीची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मी, पो.नि. दिघे व ०२ सरकारी पंच हे ला.प्र.वि. कार्यालयातील पहील्या माळयावरील, रूम नं. १०२, गोपनीय कक्षामध्ये गेले. तेथे मी, पो.नि. दिघे व ०२ पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले. त्यानंतर मी, पंच, पो.नि. दिघे, स.पो.आ. माणगावे व पोलीस पथक असे ला.प्र.वि. कार्यालयाच्या बाहेर येवून ०२ सरकारी वाहनांनी म्हाडा कार्यालय, बांद्रा, मुंबईच्या दिशेने रवाना झाले. पो.नि. दिघे यांनी माझा मित्र सिध्दार्थ काळे यांस बांद्रा येथे परस्पर येण्यास सांगितले. शासकीय वाहन कला नगर जक्शन ओलांडल्या नंतर सर्विस रोडने पश्चिम द्रुतगती मार्गावर काही अंतरावर रामकृष्ण कन्स्ट्रक्शनचे काम सुरू असलेल्या ठिकाणी कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे जावून

Sunitadighe PI



[signature]

थांबले. पो.नि. दिघे यांनी दुसरे वाहन बांद्रा कोर्ट येथील सर्विस रोड येथे रस्त्यालगत कोणास संशय येणार नाही अशा रितीने पुढील आदेशापर्यंत थांबण्याच्या सूचना दिल्या. त्याप्रमाणे दुसरे वाहनातील पथक हे सदर ठिकाणी थांबुन राहीले. तेथे गेल्यानंतर पो.नि. दिघे यांच्या सांगणेवरून पो.ह. यादव यांनी माझ्या शर्टाचे आतील बाजूस बनियानला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून सुरू केला. त्यानंतर माझे सोबत पंच क्र. १/बोडरे असे आम्ही श्री. श्रेष्ठ यांना भेटण्यास त्यांचे म्हाडा, बांद्रा येथील कार्यालयात गेलो.

श्री. श्रेष्ठ यांचे कार्यालयात पोहचल्यानंतर कार्यकारी अभियंता दिनेश श्रेष्ठ यांनी मला ओळखले आणि बसण्यास सांगितले. मी माझ्या कामाच्या विषयाबद्दल दिनेश श्रेष्ठ यांचेशी बोललो असता त्यांनी संबंधीत टेबलचे काम बघणाऱ्या जयश्री मॅडम यांना बोलाविले. त्यांच्याशी फाईलबाबत चर्चा केली. यापूर्वी माझ्याकडे मागणी केल्याप्रमाणे ६०,०००/– रूपयांमध्ये काहीतरी रक्कम कमी करण्याची विनंती मी त्यांना केली असता, आपण नंतर बघू असे श्रेष्ठ साहेब म्हणाले. माझे वैयक्तीक अभय योजनेच्या कामाचे ६०,०००/– रूपये मी खाजगी इसम त्रिवेदी साहेबांना देवू का? अशी विचारणा केली असता, श्रेष्ठ साहेबांनी होकार दर्शविला. त्यानंतर मी सोसायटीच्या अध्यक्षांच्या कामाबाबत विचारणा करून यापूर्वी सांगितलेली रक्कम कमी करण्याची विनंती केली असता, आपण नंतर बघुया, एकदा जावून सांगून त्रिवेदी यांना भेटण्यासाठी श्री. श्रेष्ठ यांनी सुचविले. त्यावर मी खाजगी इसम त्रिवेदी यांना भेटतो, असे सांगितले. कार्यकारी अभियंता श्रेष्ठ साहेबांच्या केबीनमधून बाहेर येवून मी खाजगी इसम त्रिवेदी यांना फोन केला असता "त्रिवेदी यांनी संध्याकाळी फोन करतो, असे सांगितले." म्हणून मी व पंच क्र. ०१/बोडरे हे शासकीय वाहन थांबविलेल्या ठिकाणी पुन्हा गेले. तेथे आल्यानंतर माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. त्यानंतर मी, पंच व पोलीस पथक पुन्हा ला.प्र.वि., वरळी, मुंबई येथे परत आलो. पो.नि. दिघे यांनी सांगितल्याप्रमाणे सायंकाळी १८.५९ वाजता पुन्हा मी खाजगी इसम संजय त्रिवेदी यांच्या मोबाईलवर संपर्क साधला असता त्यांनी उदया दि. ०५/०२/२०२५ रोजी सकाळी १०.३० च्या सुमारास कांदिवलीच्या पुढे–मागे भेटतो, असे फोनवरून सांगितले.

मला पो.नि. दिघे यांनी दिनांक ०५/०२/२०२५ रोजी सकाळी ०९.०० वा. ला.प्र.वि. कार्यालयात हजर राहण्यास सांगितल्याने मी व माझा मित्र सिध्दार्थ काळे हजर झालो. त्यानंतर पो.नि. दिघे यांनी मला सापळापूर्व/सापळा कारवाई करावयाच्या कारवाईची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सूचना दिल्या. त्यानंतर मी, पो.नि. सुनिता दिघे, ०२ सरकारी पंच कार्यालयातील पहील्या माळयावरील, रूम नं. १०३, गोपनीय कक्षामध्ये गेले. तेथे मी, पो.नि. दिघे व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले.

मी, पंच, पो.नि. दिघे, स.पो.आ. माणगावे व पोलीस पथक असे ला.प्र.वि. कार्यालयाच्या बाहेर येवून ०२ सरकारी वाहनाने ला.प्र.वि. कार्यालयाच्या बाहेर पडलो. माझा मित्र काळे यांस माझी मोटार सायकल बांद्रा येथे घेवून येण्यास सांगितले. पोलीस पथकातील ०२ पोलीस हे दुसऱ्या एका मोटार सायकलवर निघाले. मी शासकिय वाहनात असताना अचानक सकाळी १०.५४ वा. च्या सुमारास खाजगी इसम त्रिवेदी यांचा फोन आल्यामुळे पंच व पोलीस पथका समक्ष मी फोन उचलला व त्याला सांगितले "ते गाडीवर आहेत, गाडी बाजूला घेवून फोन करतो.", त्यानंतर कलानगर जंक्शन, पश्चिम द्रुतगती मार्गाच्या सर्विस रोडवरून डाव्या दिशेला बी.जी. खेर मॅटर्निटी हॉस्पिटलच्या आवारात येवून थांबलो. पो.नि. दिघे यांच्या सुचनेप्रमाणे मी खाजगी इसम त्रिवेदी यांना फोन केला त्यावेळी त्रिवेदी यांनी मला ते जोगेश्वरी क्रॉस केल्यानंतर फोन करतील, असे सांगितले. नमुद कॉल डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेला आहे.

त्यांनतर स.पो.आ. माणगावे व पो.नि. दिघे यांनी पोलीस पथकाचे दोन पथकात विभाजन केले. पो.नि. दिघे, पो.ह. सावंत, पो.ह. खरूळे, म.पो.ह. मांजरेकर असे लोकसेवक यांचे कार्यालय बांद्रा येथे दुसऱ्या शासकिय वाहनात बसून निघून गेले. स.पो.आ. माणगावे यांनी मला व पंच क्र. १ बोडरे यांना पुढील सूचना दिल्या. मी केलेल्या बचती मधून ठेवलेले रू ६०,०००/– स.पो.आ. माणगावे यांच्याकडे दिले. पोलीस

पथकाने पंचां समक्ष रू. ६०,०००/— रक्कमेच्या नोटांचे फोटो काढले. त्यांनतर वाहन चालक पो.शि.चा. कदम यांनी नोटांना अँथ्रासिन पावडर लावून ती रक्कम एका वर्तमान पत्रामध्ये गुंडाळून माझ्या पॅन्टच्या उजव्या खिश्यात ठेवली. पो.ह. यादव यांच्या मदतीने डिजीटल व्हाईस रेकॉर्डर माझ्या शर्टच्या आतील बाजूस लावला. मी व पंच क्र १/बोडरे असे माझ्या मोटर सायकलवर बसून अंधेरीच्या दिशेने निघाले. माझ्या मागोमाग एक पोलीस पथक मोटार सायकलवर व उर्वरीत पोलीस पथक शासकीय वाहनातून माझ्या मागोमाग येत होते. मी व पंच क्र. १ असे वाकोला ब्रिजखाली थांबून मी खाजगी इसम त्रिवेदी यांना माझ्या मोबाईलचा स्पिकर ऑन करून फोन केला असता खाजगी इसम त्रिवेदी यांनी मला तेथेच थांबण्यास सांगितल्याने मी व पंच क्र. ०१ तेथेच थांबलो. मी बाजूला असणाऱ्या श्री. गणेश जनरल स्टोर, नेहरू रोड, हाईवे जक्शन सांताक्रझ येथे थांबलो होतो. त्यांनतर मी त्रिवेदी यांना फोन केला व त्यांना माझे लोकेशन सांगितले. माझ्या पाठीमागून एक ऑटो रिक्षा आली. सदर रिक्षा मधून खाजगी इसम त्रिवेदी हे माझ्याशी बोलण्यासाठी खाली उतरले. खाजगी इसम त्रिवेदी व माझ्यामध्ये माझ्या कामासंदर्भात चर्चा झाली. मी त्रिवेदी यांना श्रेष्ठ साहेब यांच्याशी बोलणे करून रक्कम कमी करण्याबाबत विनंती केली असता, त्रिवेदी यांनी सांगितले की, ''वो सुनता नही है... किसीका नही सुनता भाई।'' ''नही तो ऐसा नही.... आपने छे साठ हा बोला है।'', ''ह... आपको कितने तलक करने का है। मै बात करता हू।'' ''एक... एक फाईलका कितना पकडा है उसने।'', ''साठ हजार... मै बात करके आपको बताता हू।'' एक फाईल कभी निकालेगा आपका। उसका जो है।'' ''एक फाईल आपका निकल लेगा, दुसरा मै बात करता हू। आप घाई मत करो।'' त्यांनतर मी माझ्या पॅन्टच्या उजव्या खिशातून ठेवलेली लाचेची रक्कम त्रिवेदीच्या उजव्या हातात दिली व त्यांनतर खाजगी इसम त्रिवेदी यांनी रिक्षा चालकास लाला भाई ये रख ले।, असे म्हणून ती लाचेची रक्कम देण्यासाठी हात पुढे केला असता, लाला भाई रिक्षा चालकाने डाव्या हाताने लाचेची रक्कम स्विकारून त्यांचे पॅन्टच्या डावे खिशात ठेवली. मी माझा चष्मा काढून शर्टाला लावला व खाजगी इसम यांनी लाचेची रक्कम स्विकारल्याचा इशारा पोलीस पथकास केला असता जवळच उभ्या असलेल्या पोलीस पथकाने संजय त्रिवेदी व ऑटो रिक्षा चालक यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात ताब्यात घेतले. त्यानंतर माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर स.पो.आ. माणगावे यांनी काढला व बंद केला. खाजगी इसम त्रिवेदी यांच्यासोबत झालेले संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले आहे. त्यांनतर स.पो.आ. माणगावे यांनी खाजगी इसम त्रिवेदी यांस लाचेची रक्कम कोणासाठी स्विकारली या बाबत विचारणा केली असता त्रिवेदी यांनी कार्यकारी अभियंता श्रेष्ठ यांच्या सांगण्यावरून त्यांचेकरिता लाचेची रक्कम स्विकारल्याचे सांगितले. खाजगी इसम त्रिवेदी यांनी त्यांचे मोबाईल वरून पोलीस व पंचा समक्ष कार्यकारी अभियंता श्रेष्ठ यांचे मोबाईलवर फोन करून माझ्याकडून रक्कम घेतलेबाबत कळविले असता समोरून कार्यकारी अभियंता श्रेष्ठ यांनी होकार दर्शविला. सदरचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे.

त्यांनतर शासकीय वाहनातील स.पो.आ. माणगावे, दोन्ही पंच व पोलीस पथक, मोटार सायकल वरिल पोलीस पथक, मी व माझा मित्र सिध्दार्थ काळे, खाजगी इसम क्र. ०१) त्रिवेदी व खाजगी इसम क्र. ०२) ऑटो रिक्षा चालक नामे राजकुमार यादव असे म्हाडा, बांद्रा कार्यालय, मुंबई येथे गेलो. त्यावेळी पो.नि. दिघे व पोलीस पथक हे कार्यकारी अभियंता श्रेष्ठ यांचेकडे नमुद प्रकरणाबाबत चौकशी करत होते. ला.प्र.वि. कार्यालयाचे कारवाईची प्रकिया पूर्ण झाल्यानंतर मी, पोलीस पथक, पंच व कार्यकारी अभियंता श्रेष्ठ, खाजगी इसम क्र. ०१) त्रिवेदी व खाजगी इसम क्र. ०२) ऑटो रिक्षा चालक नामे राजकुमार यादव हे पहिल्या शासकीय वाहनातून ला.प्र.वि. कार्यालयास येण्यास निघाले. तसेच मोटार सायकल वर माझा मित्र सिध्दार्थ काळे व दुसऱ्या मोटार सायकलवर पोलीस पथक हे ला.प्र.वि. कार्यालयास येण्यास रवाना झाले. तसेच दुसऱ्या शासकीय वाहनात पोलीस पथक व ऑटो रिक्षा चालक राजकुमार यादव हे ला.प्र.वि. कार्यालयात परत आले.

तरी, माझे काका श्री. विक्रम शा. बनसोडे, यांनी मिलींद चाळ, हनुमान नगर, अकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई येथील झोपडे दिनांक ०७/०८/२०१० रोजी मला बक्षीसपत्र करून दिलेले आहे. मी, दिनांक ३१/१२/२०२४ रोजी कार्यकारी अभियंता, बोरीवली विभाग/मुंबई मंडळ, म्हाडा, बांद्रा, मुंबई येथे अभय योजने अंतर्गत परिशिष्ट २ मध्ये हस्तांतरण करणेबाबत अर्ज केला होता. त्या संदर्भात पाठपुरावा करण्यासाठी

मी दिनांक २७/०१/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वा सुमारास कार्यकारी अभियंता श्री. दिनेश श्रेष्ठ यांची भेट घेतली. त्या भेटीमध्ये माझ्या व इतर १० झोपडपट्टीधारक यांच्या प्रलंबित कामाबाबत पाठपुरावा केला असता कार्यकारी अभियंता श्री. श्रेष्ठ यांनी माझे कामाचे रू ६०,०००/– व इतर १० झोपडपट्टी धारकांचे प्रत्येकी रू.६०,०००/– प्रमाणे असे एकूण ६,६०,०००/– इतक्या रक्कमेची लाचेची मागणी केली होती. दिनांक ०४/०२/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पडताळणी कारवाईत पंचांसमक्ष कार्यकारी अभियंता श्रेष्ठ यांनी लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. दिनांक ०५/०२/२०२५ रोजी सापळा कारवाई दरम्यान खाजगी इसम संजय त्रिवेदी यांनी कार्यकारी अभियंता यांचे सांगणे वरून रू ६०,०००/– इतकी लाचेची रक्कम स्विकारली. नमुद रक्कम स्विकारताना खाजगी इसम संजय त्रिवेदी व रिक्षा चालक राजकुमार यादव यांना रंगेहाथ पकडले. म्हणून माझी श्री. दिनेश श्रेष्ठ, कार्यकारी अभियंता, बोरीवली विभाग, बांद्रा, मुंबई, खाजगी इसम संजय त्रिवेदी व खाजगी इसम रिक्षा चालक राजकुमार यादव यांच्या विरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे लोकसेवक कार्यकारी अभियंता, बोरीवली विभाग, बांद्रा, मुंबई, खाजगी इसम संजय त्रिवेदी व खाजगी इसम रिक्षा चालक राजकुमार यादव यांचे बरोबर कोणतेही देवाण घेवाण चे व्यवहार नाहीत किंवा कोणतेही पुर्ववैमनस्य नाही.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून, ती मला मराठीत वाचून तसेच समजावून सांगितली असता, ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

(सुनिता दिघे)
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे — निरंक
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/ अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकुण मुल्य ........
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ........
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.
थोडक्यात वर नमूद तारीख वेळी व ठिकाणी कॉलम क्र. 07 मधील आरोपी क्र. 01 यांनी फिर्यादी यांनी त्यांचे कार्यालयात केलेल्या आश्रय योजने अंतर्गत दिलेल्या अर्जाच्या-बदल्यात व इतर 10 झोपडपट्टी धारकांचे प्रलंबित अर्जांबाबतचे प्रलंबित कामासाठी प्रत्येकी 60,000/- रु. प्रमाणे असे एकूण 6,60,000/- रु. ची मागणी करून फिर्यादी यांचे 60,000/- रु. स्वतःसाठी स्वीकारून आरोपी क्र. 02 यांचेकडे देण्यास सांगितले असता आरोपी क्र. 02 यांनी फिर्यादी यांचेकडून रु. 60,000/- इतकी लाच रक्कम स्वीकारली म्हणून आरोपी क्र. 02 यांनी लाचेची रक्कम आरोपी क्र. 03 यांचेकडे दिली असता आरोपी क्र. 02 व 03 यांना लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून गुन्हा

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कालम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........,
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .................. Rank.................. No. ............. to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .................................................. (3) Transferred to P.S .................................................., District ............................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name सुनिल पांडुरंग शिंदे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक,
तपासिक अं. चा कोड. क्र. ला.प्र.वि., मुंबई
Posting
Code No. of I. O. .............................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner